


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३०९ ●सोमवार, दि.०९ फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# भरत गित्ते ब्रँड ॲम्बेसिडर; तौरल इंडिया सुपा प्रकल्प

## महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मविश्वासाचा उत्सव : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'तौरल इंडिया-सुपा प्लांट'चे भव्य उदघाटन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज पारनेर, अहिल्यानगर येथे 'तौरल इंडिया-सुपा प्लांटचे' उदघाटन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योजक भरत गित्ते अभिनंदन व कौतुक करत भरत गित्ते हे महाराष्ट्राच्या नवउद्योग विश्वाचे ब्रँड ॲम्बेसिडर ठरल्याचे सांगितले.तसेच तौरल इंडिया सुपा प्रकल्प सुरु होत आहे हा महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मविश्वासाचा उत्सव असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तौरल इंडियाचे संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गित्ते यांनी सुरु केलेल्या पारनेर, अहिल्यानगर येथील 'तौरल इंडिया-सुपा प्लांटचे' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा.



राम शिंदे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत, खासदार डॉ. भागवत कराड, तौरल इंडियाचे संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते, ह.भ.प. नामदेवशास्त्री महाराज, ह.भ.प. शिवाजी महाराज आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तौरल इंडिया-सुपा प्लांटच्या यंत्रसामग्रीची

▶▶ उर्वरित पान २ वर

### ●उद्योजक भरत गित्ते यांचे मुख्यमंत्र्यांकडून भरभरून कौतुक

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योजक भरत घेतले यांचे भरभरून कौतुक केले भरत गीते यांनी आपल्या स्वकर्तृत्वातून व आपल्या ज्ञान आणि प्रयत्नातून अतिशय उत्तम अशा प्रकारचा उद्योग स्थापित केला आहे भगत गीते यांचा गतिशीलपणाने उद्योग उभारण्याचा आदर्श एक उदाहरण म्हणून नवउद्योजकांसाठी समोर आलेला आहे. त्यांच्या उद्योग क्षेत्रातील ज्ञान प्रयत्न व कर्तुत्वावर परदेशातील प्रसिद्ध युनिव्हर्सिटीत यांच्यावर एक स्टडी प्रकाशित करते असे उत्तुंग व्यक्तिमत्व भरत गीते यांचे असल्याचे गौरव उद्गार मुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले. आमचे मित्र असा उल्लेख करत एक उद्योजक म्हणून स्वतःच्या भरोशावर उद्योग उभा केलेला आहे आणि कमी कालावधीत त्यांनी काम करून दाखवलं आहे त्याबद्दल त्यांचे मी अतिशय मनापासून अभिनंदन करतो.भरत गित्ते हे महाराष्ट्रासाठी नव उद्योजकांना एक ब्रँड अँबेसिडर म्हणून परिचित झाले असल्याचा गौरव त्यांनी केला. या प्रकल्पाचे उद्घाटन करताना अतिशय आनंद होतोय कारण हा प्रकल्प म्हणजे महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मविश्वासाचा उत्सव आहे असा आवर्जून उल्लेखही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला.

# भारत-अमेरिका कराराच्या निषेधार्थ शेतकरी संघटनांकडून भारत बंदची हाक

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत-अमेरिका व्यापार कराराला शेतकरी संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. अमेरिकन शेती उत्पादनांवरील कर कमी केल्याने किंवा पूर्णपणे हटवल्याने भारतीय शेतकऱ्यांवर नकारात्मक परिणाम होईल, अशी भीती संयुक्त किसान मोर्चाने व्यक्त केली आहे. अमेरिकन शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोठ्या अनुदानामुळे भारतीय शेतकरी त्यांच्याशी स्पर्धा करू शकणार नाहीत, हा




प्रमुख आक्षेप आहे. याविरोधात १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. अखिल भारतीय किसान सभेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारत आणि अमेरिकेदरम्यान प्रस्तावित अंतरिम व्यापार करार हा भारतीय शेतीचे अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्यांसमोर संपूर्ण शरणागती आहे. हा व्यापार करार सुक्या धान्याच्या चुऱ्यासारख्या वस्तू, पशुखाद्यासाठी लाल ज्वारी आणि सोयाबीन तेलासाठी बाजारपेठ खुली करून कृषी क्षेत्रावर खोलवर परिणाम करेल आणि यामुळे

▶▶ उर्वरित पान २ वर

# माझा फोन नंबर का ब्लॉक केला असं म्हणत गेवराईच्या तरुणाचा नर्तकीवर प्राणघातक हल्ला

**जामखेड । प्रतिनिधी**

तु मला फोनवर का बोलत नाही? माझा नंबर ब्लॉक का केला? असे म्हणत रागातून नर्तिकेवर कोयत्याने वार करत गंभीर जखमी केले. जखमी महिलेवर जामखेड येथील एका खासगी रुणालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर हल्लेखोर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला आहे.जख्मी महिला जामखेड येथील कलाकेंद्रात नृत्यांगना म्हणून काम करीत आहे. या घटनेने खळबळ



उडाली आहे.या प्रकरणी पिडीत महीलेचा मित्राविरोधात दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी राहूल अशोक कचरे याच्या विरोधात जीवे मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर असे की, जामखेड शहरातील तपनेश्वर भागात राहणाऱ्या आणि सांस्कृतिक कला केंद्रातील नृत्यांगनेचे या गुन्ह्यातील आरोपी राहूल अशोक कचरे याचे सोबत मागील पाच वर्षांपासून मैत्रीचे संबध होते. यापुर्वी देखील त्रास देत असल्याने महिलेने कचरे विरोधात गुन्हा दाखल केलेला आहे. याच त्रासातून गुरुवार दि. ५

▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती संभाजीनगरमध्ये CTET परीक्षेत महिलांचा अपमान

## मंगळसूत्र, जोडवे काढायला लावल्याने खळबळ, दोषींवर गुन्हे दाखल करा

### ●विना अनुदानित शाळा कृती समितीची मागणी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेदरम्यान (CTET) छत्रपती संभाजीनगर येथील काही परीक्षा केंद्रांवर महिला उमेदवारांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. परीक्षा केंद्रात प्रवेश देताना सुरक्षा तपासणीच्या नावाखाली महिलांना त्यांचे मंगळसूत्र, जोडवे आणि बांगड्या काढण्यास सक्ती करण्यात आली. या असंवेदनशील प्रकारामुळे परीक्षार्थी महिलांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, या प्रकरणातील दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण



विभागाकडे केली. या बाबत मिळालेल्या माहिती अशी की, केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेदरम्यान (CTET) छत्रपती संभाजीनगर येथील काही परीक्षा केंद्रांवर तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांनी महिलांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक भावनांचा विचार न करता, त्यांना सौभाग्याचे अलंकार काढायला लावले. यामुळे अनेक महिला

▶▶ उर्वरित पान २ वर

# शिक्षकाच्या गळ्याला चाकू लावून तिघांनी लुटले; गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

आमच्या गाडीला तू कट का मारला? असे कारण पुढे करत एका शिक्षकाला रस्त्यात अडवून त्याच्या गळ्याला चाकू लावला; त्याच्या हातातील दोन अंगठ्या, एक मोबाईल, नगदी पाच हजार असा एकूण ६२ हजाराचा ऐवज काढून घेतल्याचा प्रकार खालापूरी-राजुरी या रस्त्यावर घडला. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविसिंग भगवान खांभेकर हे कमळेश्वर धानोरा केंद्र खालापुरी या ठिकाणी



शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ७ तारखेला ते शाळेतून घरी मोटार सायकलवरून

▶▶ उर्वरित पान २ वर

# ३ दिवसांत निर्णय झाला नाही तर महाराष्ट्रातील ST कर्मचारी संपावर जाणार?




**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील डढ कर्मचाऱ्यांनी संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. एसटी महामंडळाच्या राज्यभरातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून आलेल्या रक्कमे सोबत वाढीव वेतनाचा फरक देण्यासाठी राज्य सरकारने कबूल करूनही एसटीला रक्कम न दिल्याने या महिन्यात वाढीव वेतनाचा फरक हप्ता मिळाला नसून कर्मचाऱ्यांची घोर फसवणूक करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे .येत्या १० तारीखच्या आता वाढीव वेतन फरक हप्ता न दिल्यास रीतसर नोटीस देऊन तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस, श्रीरंग बरगे यांनी दिला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाला साधारण ४७५ कोटी रुपये इतकी रक्कम लागत असून त्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# आमदाराच्या मुलाने EVM चे बटन दाबले;

## तीन कर्मचाऱ्यांची नोकरी गेली; यात चुक कोणाची?

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात आज मतदानावेळी घडलेल्या घटनेने चर्चांना उधाण आले आहे. शिवसेनेचे आमदार विलास भुमरे हे पाचोडमध्ये मतदानाला गेले असताना त्यांचा लहान मुलगाही त्यांच्या सोबत होता. मतदानानंतर आमदार भुमरेंच्या बोटाला शाई लावताना त्यांच्या मुलाच्याही बोटाला मतदान अधिकाऱ्याने गंमत म्हणून शाई लावली. या प्रकरणात आता मोठी कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ दरम्यान झालेल्या निवडणूक प्रक्रियेत हलगर्जीपणा झाल्याप्रकरणी पैठण तालुक्यातील पाचोड बु. येथील मतदान केंद्रावरील तीन कर्मचाऱ्यांना तत्काळ




प्रभावाने निलंबित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी दिली आहे. सदर मतदान केंद्र क्रमांक ५८-पाचोड बु.११५-पाचोड बु.५८/७, जि.प.कें.प्रा.शाळा पाचोड बु. (पश्चिम बाजू), खोली क्रमांक ४ येथील १) केंद्रप्रमुख श्री दिलीप देवराव नरवडे, सहायक शिक्षक, संत एकनाथ हायस्कूल, चित्तेगाव ता. पैठण २) मतदान अधिकारी क्रमांक ३ सौ. संगीता नामदेव केदार, सहायक शिक्षक, जि.प. प्रा. शाळा, कल्याण नगर, पाचोड ता. पैठण आणि ३) सौ. रेणुका सुरेश बोंबले, होमगार्ड (बक्कल क्र. २७१३), पैठण पथक, पोलीस ठाणे पाचोड यांचेकडून निवडणुकीसारख्या अतिसंवेदनशील कामकाजात बेजबाबदारपणा व हलगर्जीपणा झाल्याचे निदर्शनास आले आहे.

मतदानाच्या दिवशी लहान मुलासोबत मतदान कक्षात प्रवेश होऊन मतदान प्रक्रियेची गोपनीयता धोक्यात येईल अशी स्थिती निर्माण होऊ दिल्याने, तसेच आवश्यक ती दक्षता न घेता दिलेल्या प्रशिक्षणानुसार नियमांचे पालन न केल्याने संबंधित तिन्ही कर्मचाऱ्यांचे स्पष्टीकरण अमान्य ठरवून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ कलम १३४ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार त्यांना मतदान समाप्त झाल्याच्या क्षणापासून

▶▶ उर्वरित पान २ वर

# धारूर आगाराच्या बसचालकाची मांजरा धरणाच्या रॅम्पला गळफास घेऊन आत्महत्या

**केज । प्रतिनिधी**

धारूर आगारात कार्यरत असलेल्या बसचालकाने केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरणाच्या रॅम्पच्या लोखंडी अँगलला गळफास घेऊन जीवन संपवले. या बाबतची माहिती अशी की,केज तालुक्यातील धनेगाव येथील रहिवाशी असलेले आत्मलिंग नामदेव गुजर यांनी दि.७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.४५



वाजण्याच्या सुमारास धनेगाव येथील मांजरा धरणाच्या डाव्या



# ‘सीआयएसएफ’ च्या वतीने वंदे मातरम्‌ सुरक्षित तटम समृद्ध भारतम’, सायक्लोथॉन- 2026 उपक्रम

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या वतीने ‘ वंदे मातरम सुरक्षित तटम समृद्ध भारतम’ सायक्लोथॉन २०२६ उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी सीआयएसएफची दोन सायकलिंग पथके एकाच वेळी बक्खली (पश्चिम बंगाल) आणि लखपत (गुजरात) येथून निघाली आहे. हे पथक एकत्रितपणे भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर सुमारे ६,५०० किलोमीटरचा प्रवास करणार आहे. ज्यामध्ये ९ किनारी राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश असून २२ फेब्रुवारी २०२६ रोजी कोची (केरळ) येथे सायक्लॉथॉनचा समारोप होईल. महाराष्ट्रात हे सायकलपटूंचे पथक १० फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी दरम्यान प्रवास करणार आहे. पालघर जिल्ह्यातील जुचंद्र गावापासून सायकलपटूंच्या प्रवासाची सुरुवात होणार आहे. ‘सीआयएसएफ’ चा सायक्लोथॉन उपक्रम राष्ट्रीय जनजागृती आणि जागरूकता आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामध्ये सायकलपटूंचे दोन्ही संघ देशातील निसर्गरम्य किनारी मार्गांवरून सायकल चालवतील, प्रमुख बंदर शहरे, मासेमारी गावे आणि ऐतिहासिक स्थळांमधून जातील आणि नंतर कोचीमध्ये त्यांचा प्रवास संपेल. सीआयएसएफ वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन २०२६ उपक्रमाचा उद्देश भारताच्या संपूर्ण किनारपट्टीवर प्रवास करणे आहे. यामध्ये नऊ किनारी राज्ये आणि चार केंद्रशासित प्रदेशांमध्ये प्रवास समाविष्ट आहे.

‘सीआयएसएफ’ कोस्टल सायक्लोथॉन–२०२६ चे उद्दिष्ट– अमली पदार्थ, शस्त्रे आणि स्फोटकांच्या तस्करीसारख्या धोक्यांबद्दल किनारी समुदायांना संवेदनशील बनविणे आणि दक्षतेला प्रोत्साहन मिळावे, असा आहे. यासह मजबूत किनारी सुरक्षा जाळ्यासाठी किनारी समुदाय आणि सुरक्षा



यंत्रणांमधील सहभाग अधिक मजबूत करणे, स्वातंत्र्य सैनिक, शहीद, सुरक्षा कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या बलिदानाचा आदर करून वंदे मातरमची भावना जागृत करणे, भारताचा समृद्ध सागरी वारसा, परंपरा, इतिहास याविषयी जनजागृती निर्माण करणे, देशाच्या सागरी समृद्ध वारसामध्ये समुदायांचे, विशेषतः मच्छीमारांचे असलेले अमूल्य योगदान अधोरेखित करणे, तरुणांमध्ये आणि किनारी प्रदेशात वास्तव्यास असलेल्या समुदायांमध्ये, तंदुरुस्ती, शिस्त आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्याचाही आहे. या उपक्रमात किनारी प्रदेशात वास्तव्यास असलेल्या समुदायांची विशेषतः मच्छिमारांची देशाचे तट प्रहरी म्हणून महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आला आहे.

गाव दत्तक घेऊन समुदायांचा सहभाग– यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या सायक्लोथॉनचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे सामुदायिक सहभाग आहे. या प्रवासादरम्यान, सायक्लोथॉन ५२ किनारी गावांमध्ये थांबेल, ही गावे सीआयएसएफ दत्तक घेईल. ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी), बंदर प्राधिकरणे आणि इतर सागरी यंत्रणांसारख्या प्रमुख भागधारकांशी समन्वय साधून, स्थानिक सीआयएसएफ सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांद्वारे समर्थित, समुदाय कल्याण आणि पायाभूत सुविधा विकास उपक्रम हाती घेणार आहेत. भारताच्या किनारपट्टीजवळ ४७ सीआयएसएफ युनिट्स असल्याने, हे दल या दत्तक घेतलेल्या गावांशी सतत आणि दीर्घकालीन संबंधातून जनजागृती विषयक उपक्रमाची अंमलबजावणी करणार आहे. सामाजिक जागरूकता आणि पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्व युवकांमध्ये पटविण्यात येणार तरूण आणि सामान्य नागरिकांना राष्ट्र उभारणीच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यासाठी भरती जागरूकता मोहीम, क्रीडा उपक्रम आणि युवा संवाद कार्यक्रम आयोजित केले जातील. युवा पोहोच योजनेत जागरूकता कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छ भारत मोहीम, वृक्षारोपण मोहीम आणि अंमली पदार्थांचा वापर आणि तस्करीविरुद्ध उपक्रम, किनारी समुदायांमध्ये सामाजिक जागरूकता, स्वच्छता आणि पर्यावरणीय जबाबदारी वाढवणे यांचा समावेश आहे. या उपक्रमातून तरुणांमध्ये सामाजिक जागरूकता आणि पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे.

महिला सक्षमीकरण आणि समावेशकता– युवा सहभाग आणि महिला सक्षमीकरण हे सायक्लोथॉनचे प्रमुख केंद्रबिंदू आहेत. विशेष म्हणजे, सहभागी सायकलस्वारांपैकी ५० टक्के महिला आहेत, जे राष्ट्रीय सेवा उपक्रमांमध्ये ‘जेंडर इक्वलिटी’ आणि महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकल्याचे निदर्शनास येत आहे. नेतृत्वाखालील सार्वजनिक संवादाद्वारे, सायक्लोथॉन नागरिकांना शिस्त, शारीरिक तंदुरुस्ती आणि राष्ट्रसेवेची भावना स्वीकारण्यास प्रेरित करण्याचा प्रयत्न या उपक्रमामधून करण्यात येणार आहे.

प्रमुख कार्यक्रम आणि लोकसहभाग– सायक्लोथॉनचा कोची येथे समारोप होण्यापूर्वी, मुंबई, गोवा, मंगळुरू, कोणार्क, विशाखापट्टणम आणि चेन्नई येथे होणाऱ्या प्रमुख कार्यक्रमांमध्ये क्रीडा, संस्कृती, चित्रपट उद्योगातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सहभाग असणार आहे. सीआयएसएफ वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन –२०२६ हा उपक्रम २०४७ च्या विकसित भारताचे प्रतिबिंब दर्शविणारा ठरणार आहे. या उपक्रमातून किनारी प्रदेशांना सुरक्षा विषयक बळकटी मिळणार असून येथील समुदायांना सक्षम बनवले जात असल्याचा संदेश मिळत आहे. सतर्क, तंदुरुस्त आणि जबाबदार नागरिक निर्माण करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच मदतगार ठरणार आहे. भारताच्या किनारपट्टीवर असलेले रिफायनरीज, शिपयार्ड आणि अणुऊर्जा प्रकल्पांसह ही बंदरे भारताच्या आर्थिक विकासासाठी आणि ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाची आहेत. तथापि, त्यांना अमली पदार्थ, शस्त्रे, स्फोटके, घुसखोरी आणि इतर बेकायदेशीर कारवाया यासारख्या सततच्या धोक्यांचा सामना करावा लागतो. मागील पाच दशकांहून अधिकच्या काळापासून सीआयएसएफकडे किनारपट्टीवरील १२ प्रमुख बंदरे आणि इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पहिल्या सीआयएसएफ कोस्टल सायक्लोथॉनच्या यशावर आधारित, २०२६ ची आवृत्ती ही ऐतिहासिक ठरणार असून लोक चळवळीच्या रूपात पुढे येत आहे. हा उपक्रम नव्या संकल्पाने आणि मजबूत राष्ट्रीय संबंधाने पुढे नेत आहे.

भारताच्या किनारपट्टीवर २० कोटींहून अधिक लोक राहतात आणि मासेमारी, नौवहन, पर्यटन आणि किनारी संसाधनांद्वारे देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देतात. ‘ ब्लू इकॉनॉमी’ ही आपल्या सागरी परिसंस्थांचे संरक्षण करताना या किनारी संसाधनांचा वापर करण्यासाठी एक शाश्वत दृष्टिकोन दर्शवते. या सायक्लोथॉनद्वारे सीआयएसएफचे उद्दिष्ट किनारी सुरक्षा, पर्यावरण संवर्धन आणि आपल्या सागरी संसाधनांच्या क्षमतेचे महत्त्व लक्षात आणून देणे आहे. भारत सरकारने आंतरराष्ट्रीय नौवहन आणि बंदर सुरक्षा नियमांनुसार सीआयएसएफला मान्यताप्राप्त सुरक्षा संघटनेचा कार्यभार सोपवला आहे. हे सायक्लोथॉन महत्त्वाच्या किनारी प्रतिष्ठानांचे रक्षण करण्याच्या आणि त्यात भारताच्या किनारी समुदायांचे प्राधान्य सुनिश्चित करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

सायक्लोथॉन केवळ एक क्रीडा स्पर्धा नाही. हे आपल्या देशाच्या किनारी समुदायांना समर्पित आहे. शाश्वत किनारी विकासासाठी कृती करण्याचे आवाहन, किनारी सुरक्षेबद्दल जागरूकता आणि आपल्या विविध राष्ट्राला एकत्र बांधणाऱ्या एकतेच्या भावनेचे प्रदर्शन आहे.

**– निलेश तायडे, विभागीय संपर्क अधिकारी**

◆ पान १ वरून पुढे...

## भरत गित्ते....

पाहणी करत माहिती घेतली. तसेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ’तौरल इंडिया-सुपा प्रकल्प’ च्या कोनशिलेचे आणि ’ल्युमिनियम मॅन’ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करत असून तंत्रज्ञान व उत्पादन क्षेत्र या प्रगतीला गती देत आहे. तसेच भारताच्या औद्योगिक प्रगतीत महाराष्ट्र दमदार पाऊल टाकत आहे. तौरल इंडिया–सुपा प्लांट प्रकल्प हा महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मविश्वासाचा उत्सव आहे. आपल्या सरकारने दावोसमधून उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये सुमारे ५०,००० कोटींची गुंतवणूक आणली आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात ११,५१९ कोटींची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १८,००० रोजगार निर्माण होतील, तर उत्तर महाराष्ट्रात जवळपास ७५,००० रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच, महाराष्ट्र शासन प्रत्येक उद्योजकाच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा संदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

## भारत-अमेरिका...

दुग्धव्यवसाय क्षेत्रावरही परिणाम होईल, असा दावा त्यांनी केला. अमेरिका आणि युरोपियन युनियनसोबत (ईयू) हे करार त्यांच्या स्थिर अर्थव्यवस्थांना फायदा पोहोचवण्यासाठी केले जात आहेत आणि ते भारतासाठी फायदेशीर नाहीत. या करारामुळे आधीच कमी उत्पन्न आणि कर्ज फेडण्यास असमर्थ असलेल्या शेतकऱ्यांवर आणखी परिणाम होईल. याच्या निषेधार्थ देशभरातील प्रत्येक गावांमध्ये १२ फेब्रुवारी रोजी निदर्शने केली जातील. या आंदोलनात सर्व राजकीय पक्ष, शेतकरी आणि शेतमजूर संघटना, कामगार संघटनांनी सहभागी सामील होण्याचे आवाहन केले.

◆ पान १ वरून पुढे...

## माझा फोन....

फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी महीलेस आरोपी राहुल कचरे याने फोनवरून् तु माझ्याशी फोनवर बोल, माझे तुझ्यावर प्रेम आहे. तु जर बोलली नाही तर मी तुला मारून टाकीन अशी धमकी दिली होती. त्यावेळी फिर्यादी महीलेने त्याचा फोन कट केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रात्री २ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी महिला ही आपल्या रूमवर असताना तिची मैत्रिण बाल्कणीत गेली असता तेथे दबा धरून बसलेला आरोपी राहूल कचरे याने नर्तीकेच्या रूममध्ये येत तु माझ्याशी का बोलत नाही? माझा नंबर का ब्लॉक केला? असे म्हणून फिर्यादी महीलेच्या बोटांवर, हातावर व डोक्यावर कोयत्याने वार करून जखमी केले आहे. त्यावेळी तिच्या मैत्रिणीने त्यास मारू नको अशी विनंती केली होती. मात्र मी तुला संपवून टाकणार आहे अशी धमकी देत आरोपी निघून गेला. या प्रकरणी २६ वर्षीय नृत्यांगनेच्या फिर्यादीवरुन आरोपी राहुल अशोक कचरे, रा. खळेगाव ता. गेवराई जि. बीड याच्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून सध्या आरोपी हा फरार आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा जाधव या करीत आहेत.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये...

उमेदवारांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. या प्रकारामुळे महिला उमेदवार तणावाखाली आल्या आणि त्याचा थेट परिणाम त्यांच्या परीक्षेतील कामगिरीवर झाला आहे. हा प्रकार केवळ छळ नसून भारतीय संविधानातील अनुच्छेद १४, १५ आणि २१ नुसार मिळालेल्या वैयक्तिक स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या गंभीर घटनेची दखल घेत विना अनुदानित शाळा कृती

◆ पान १ वरून पुढे...

समितीच्या वतीने संघटनेचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे, रवींद्र तम्मेवार, अमित भाई प्रसाद, प्रवीण पारसे, वैजनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, मुक्ता मोटे मॅडम, आत्माराम वाव्हळ, सुरेखा गायकवाड मॅडम, भागवत यादव, दैवशाला मुंडे मॅडम, रामदास जामकर, अशोक मोरे, शेख सर, कवचट सर, शेंडगे सर, सुरेश कदम आदी पदाधिकाऱ्यांनी शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आणि शिक्षण संचालकांना निवेदन दिले आहे. या निवेदनाद्वारे ज्या केंद्रांवर महिलांचा अपमान झाला, त्या केंद्र संचालकांसह संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात यावेत तसेच, भविष्यात परीक्षा केंद्रांवर अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने स्पष्ट लेखी मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. महिलांच्या सन्मानाला धक्का लावणाऱ्या या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## शिक्षकाच्या गळ्याला....

येत होते . यावेळी खालापुरी राजुरी रस्त्यावर त्यांना अभिजीत शरद पवार व अन्य दोन जणांनी रस्त्यावर अडवले. तू आमच्या गाडीला कट का मारला ? असं विचारत शिक्षकाला मारहाण केली. त्यांच्या गळ्याला चाकू लावून दोन अंगठ्या, एक मोबाईल, नगदी पाच–हजार, आधार कार्ड, एटीएम कार्ड असा ६२ हजाराचा ऐवज जबरदस्तीने काढून घेतला. या प्रकरणी शिक्षक खांबेकर यांच्या तक्रारीवरून अभिजीत पवार व अन्य दोघा जणांविरोधात बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ३ दिवसांत....

सोबतच वाढीव वेतनवाढ फरकाचा हप्ता देण्यासाठी ५८ कोटी ३० लाख

◆ पान १ वरून पुढे...

रुपये इतकी अतिरिक्त रक्कम लागत आहे. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या सर्व श्रमिक संघटनाच्या बैठकीत सन २०२० ते २०२४ या कालावधीसाठी जी वेतनवाढ करण्यात आली होती. त्या कालावधीचा वेतनवाढ रक्कमेचा फरक हप्ता म्हणून राज्य सरकार दर महिन्याला साधारण ६५ कोटी रुपये इतकी रक्कम देईल असे जाहीर करण्यात आले होते. पण ती रक्कम राज्य सरकारने गेले दोन महिने एसटीला दिलीच नाही. दोन महिने सदर रक्कम एसटीने स्वतःच्या तिजोरीतून कर्मचाऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला व राज्य सरकारची अब्रू वाचवली. या महिन्यात सदर तीन महिन्याची एकूण ११६.६९ कोटी रुपये इतकी देण्यात यावी असे पत्र महामंडळाने दिनांक २० जानेवारी रोजी राज्य सरकारकडे पाठवले होते. तरी देखील ही रक्कम या महिन्यात न आल्याने व्यवस्थापनाने ही वाढीव रक्कम कर्मचाऱ्यांना वेतनासोबत न देण्यास निर्णय घेतला असून आज फरकाविना आज सर्व कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात आले आहे. एकतर ४२०० कोटी रुपयांची वैधानिक देणी थकली असताना पुनः ही वाढीव रक्कम न देणे ही कर्मचाऱ्यांची अवहेलना असून येता तीन दिवसात जर वाढीव वेतनाच्या फरकाची रक्कम देण्यात आली नाहीतर रीतसर नोटीस देऊन एसटी कर्मचारी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करतील असा इशाराही बरगे यांनी दिला आहे.

## आमदाराच्या मुलाने....

शासकीय सेवेतून तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी, पैठण यांना देण्यात आले असून, निलंबन काळातील निर्वाह भत्त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित प्राधिकरणांना देण्यात आले आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## विभागीय व्हॉलीबॉल...

या उल्लेखनीय यशाबद्दल आनंद चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष मा. आ. भीमराव धोंडे, संचालक डॉ. अजय धोंडे, तसेच प्रशासकीय अधिकारी सर्वश्री डॉ. डी. बी. राऊत, एस. जी. विधाते, डी. झेड. बोडखे, सागर वाघुले, संदीप नन्नवरे डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) महाविद्यालय आष्टीचे प्राचार्य प्रा. संजय बोडखे यांनी संघाचे अभिनंदन केले. यावेळी संस्थेअंतर्गत महाविद्यालयांचे प्राचार्य – छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरसूल श्रीराम, महेश आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत गोसावी, महेश अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रागीट सतीशचंद्र, अन्न तंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. साईनाथ मोहळकर आणि फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनीही संघाच्या कामगिरीचे कौतुक करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सलग तीन वर्षांच्या या हॅटट्रिक विजयानिमित्त आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) आष्टीच्या क्रीडा परंपरेला अधिक बळ मिळाले असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धे तही संघ भरीव यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## स्व. अमोल...

रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली, याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे विशेष कौतुक केले. रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे. आपण दिलेले रक्त संकटाच्या वेळी अनेकांचे प्राण वाचवू शकते. रक्तपेढ्यांमध्ये नेहमीच रक्ताची टंचाई असते, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मोठी धावपळ करावी लागते. अनेक वेळा रक्त न मिळाल्याने दुर्दैवी घटना घडतात. अशा परिस्थितीत रक्तदान करून गरजू रुग्णांना मदत करण्याची

◆ पान ४ वरून पुढे...

संधी युवा मंचने उपलब्ध करून दिली आहे, असे मत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी स्व. अमोल गलधर युवा मंचचे पदाधिकारी शंकर वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, सुरज कदम, सचिन आगवान, करन वायभट, संतोष शिंदे यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीचे कर्मचारी गणेश रोटे, संतोष गायकवाड, सतीश गायकवाड यांनी रक्तसंकलन केले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी दत्ता झोडगे, ज्योत्स्ना शिंदे, सीमा हिंदोळे यांच्यासह अ‍ॅड. गणेश वाणी, दादा गायकवाड, बाळकृष्ण थोरात, रामचंद्र मुळे, अक्षय येडे, गणेश घाडगे, ओंकार पवार, उमेश थोरात, बबलू आबदार, पप्पू थोरात, रोहित तागड, केशव गिरे, विजय वाणी, जीवन मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## तलवाडा ग्रामपंचायतने....

आल्याने त्वरितादेवीच्या भाविक भक्तांसह अंबिका ग्रुप व गावकऱ्यांनी तलवाडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी श्री सोपान मुसळे व तलवाडा ग्रामपंचायतच्या पदाधिका–यांना धन्यवाद देत आभार मानले आहे यावेळी तलवाडा ग्रामपंचायतचे कर्मचारी दत्ता मोरे, गणेश हातागळे व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन हे उपस्थित होते.

## ना. पंकजाताईंचे माध्यमातुन....

१५०० विविध प्रकारची उत्कृष्ट माहिती देण्यात येणार आहे त्यामुळे या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी व बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## ग्लोबल विकास...

भविष्यात अधिकाधिक काम करण्याची ऊर्जा मला मिळते. दरवर्षी असा अतिभव्य विवाह सोहळा आयोजित करून गोरगरीब कुटुंबांना मदतीचा हात देण्याचीही घोषणा आजच्या विवाह सोहळा प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना जलनायक मयंक गांधी यांनी बोलून दाखवली. यंदाच्या विवाह सोहळ्यात सहभागी ११ जोडप्यांच्या नावे रुपये २५ हजारांची बचत ठेव ठेवण्यात येणार असल्याचेही संयोजकांनी घोषित केले. विवाह सोहळ्यात सहभागी वधूला सोन्याचे मणी मंगळसूत्र तसेच पैंजणही भेट देण्यात आले. आलेल्या सर्व वऱ्हाडी मंडळीची भोजन आणि बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. ऋतढ च्या सर्व स्वयंसेवकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. ८११ जोडप्यांच्या नावे प्रत्येकी २५ हजारांची बचत ठेव– ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने दरवर्षी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदाही सलग दुसऱ्या वर्षीचा विवाह सोहळा संपन्न झाला. या विवाह सोहळ्यात सहभागी जोडप्यांना संसारोपयोगी साहित्य, वधूला सोन्याचे मणी मंगळसूत्र व पायातील पैंजण आणि त्याचबरोबर प्रत्येक जोडप्याच्या नावे २५ हजारांची बचत ठेव बँकेत करण्यात येत आहे. कॉट, गादी, संसारोपयोगी भांडे तसेच अन्य वस्तूंची भेटही या विवाह सोहळ्यात देण्यात आली असून, दरवर्षी हा सोहळा आयोजित केला जाईल असेही घोषित करण्यात आले.

## पुढचा चंपावती....

यावेळी बीड नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, राष्ट्रवादीचे गटनेते फारुख पटेल, शिवसेनेचे नगरसेवक व बांधकाम सभापती संजय उडान, राष्ट्रवादीचे स्वच्छता सभापती शेख निजाम, बाळासाहेब गुंजाळ, नगरसेविका रेशमा सरवदे, मोमीन सीमा परवीन, नगरसेवक जैतुल्ला खान, सीता मोरे, भैय्यासाहेब मोरे, महंमद नुझहत आरा मुनिरुद्दीन, शेख अशफाक शेख इशाक, मनोज गोडसे, शिवसेनेचे नगरसेवक सूरज चुंगडे, शितल

◆ पान ४ वरून पुढे...

चक्रे, एमआयएमचे नगरसेवक सय्यद इलियाज हमीद, नगरसेवक दिनेश मुंदडा, भीमराव वाघचौरे, रणजित बनसोडे, प्रमोद शिंदे तसेच शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार शिवसेनेच्या वतीने करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे यांनी केले. याबरोबरच बीड नाट्यगृहाच्या नूतनीकरणास तात्काळ सुरुवात व्हावी, हे नूतनीकरण कलाकारांच्या देखरेखीखाली पार पडावे. तसेच अद्यावत नाट्यगृहात केवळ संस्कृतीक कार्यक्रमच व्हावेत. अशी इच्छा बीड कलाकारांच्या वतीने व्यक्त केली. कलाकारांच्या यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी कलाकारांच्या मागण्या पूर्ण करणे ही आता आपली सामूहिक जबाबदारी असून कलाकारांच्या कलागुणांना समृद्ध करणारा चंपावती महोत्सव अविरत सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते फारुख पटेल यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप व कलावंत प्रतीक कांबळे यांनी बालकलाकारांसाठी सुरू केलेला चंपावती महोत्सव आज बीड जिल्ह्याची मोठी सांस्कृतिक चळवळ व कला क्षेत्राची भावना बनल्याचे सांगत शुभेच्छा दिल्या. बीड नाट्यगृह दुरुस्तीसाठी साडेआठ कोटींचा निधी; एकही रुपया वाया जाणार नाही– विनोद मुळूक

बीड नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी सातत्याने पाठपुरावा करून साडेआठ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याची माहिती दिली. हा निधी पूर्णपणे कलाकारांच्या नाट्यगृहाच्या दुरुस्ती व अद्ययावत सुविधांसाठीच वापरण्यात येणार असून त्यातील एकही रुपया वाया घालवला जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. या निधीचा पारदर्शक वापर केला जाईल तसेच संपूर्ण खर्चाचा हिशोब नागरिकांसमोर मांडण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या ठाम भूमिकेचे उपस्थित कलाकार व रसिक श्रोत्यांनी जोरदार टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करत समाधान व्यक्त केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात बुधवारी (दि.11) पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे, या मेळाव्याचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सुरेश बहुरे यांनी केले आहे.

या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील टोयोटा किर्लोसकर मोटर, परकिन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कॉस्मो फिल्म्स प्रा. लि., औरंगाबाद टो सिलरी, संजीव टो पार्टस् मॅन्यूफॅक्चरिंग लिमिटेड, रूचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड, साई सुप्रिम इक्वीपमेंट, चिकलठाणा, वार्नर इलेक्ट्रॉनिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, शेंद्रा, क्लॅड मेटल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, एक्सल/ रूचा इंजिनियरिंग, बागला गृप, अलंकार इंजिनिअरींग ईक्युपमेंट प्रा. लि. शेंद्रा, एस एस कंट्रोल प्रा.लि., इंडूरन्स टेक्नोलॉजी लि., निपूण स्कील्स / मल्टीसर्व्हिसेस, एआरएमएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, मेडिरिक्रूटर्स – पॅन इंडिया, लाईफ इंश्यूरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, धूत टोमोटिव सिस्टीम प्रा. लि., रिझल्ट सिएक्स प्रा. लि., युनिकेअर हेल्थ केअर प्रा. लि., क्वेस क्रॉप प्रा. लि., श्री गणेश प्रेस प्रा. लि., शॉपर्स स्टॉप प्रा. लि., समर्थ इलेक्ट्रोकेअर प्रा. लि., अजिंक्य ग्रूप ऑफ बिझनेस, पंचशिल बिल्डकॉइन, कल्याण ज्वेलर्स इंडिया लिमिटेड, हम्मा फूड्स प्रायव्हेट लिमिटेड, पिएमएम परिहारमिलन इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, कैझन प्लास्टोमोल्ड प्रायव्हेट लिमिटेड, इंस्टर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, डॉ. रेड्डी फाउंडेशन, व्हीज्युअल इंन्फोसिस्टीम प्रा.लि., एक्सीडी इंडिया प्रा. लि., बुश इलेक्ट्रोमेक ड इंजिनिअरींग प्रा.लि., नाथ फॉईल्स प्रा.लि., नेटलॅप ईट ट्रेनींग ड सोलूशन अशा नामांकित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. या विविध ३७ आस्थापनांकडून २५३३ रिक्तपदे प्राप्त झालेली असून ते प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखत घेणार आहे. त्यासाठी कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक युवक युवतींसाठी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा बायोडाटाच्या प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदांसाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०–२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. बुधवार दि.११ रोजी सकाळी साडेनऊ वा. कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून पात्रतेप्रमाणे विविध नियोक्तृयांकडे मुलाखती देवून रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर जयंती वैशाली बुद्धविहारात उत्साहात साजरी

## निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

परळी वै. । प्रतिनिधी

त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती वैशाली बुद्धविहार, पंचशील नगर, परळी येथे मोठ्या हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध, परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण रमाताई उबाळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामूहिक



त्रिशरण व पंचशील घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रानबा गायकवाड यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार वेंकटेश मुंडे, भैय्यासाहेब आदोडे, सचिन रणखांबे, नवनाथ डाने, संपादक बालाजी जगतकर, प्रा. प्रवीण फुटके, दत्ता सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून माता रमाई यांच्या त्यागमय जीवनकार्याचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक राजलक्ष्मी विकास जाधव (माऊंट लिटरा झी स्कूल, परळी) हिने पटकावला. द्वितीय क्रमांक मानसी नवनाथ शेरकर (जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, मोहा) हिने मिळवला, तर तृतीय क्रमांक रिया रावसाहेब जगतकर (कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला (कनिष्ठ) महाविद्यालय, परळी वैजनाथ) हिने पटकावला. तसेच प्रोत्साहनपर बक्षिसे प्रतिज्ञा बाबासाहेब रोडे (मिलिंद ज्युनिअर महाविद्यालय, परळी), आर्वी आशिष आरगडे (संस्कार प्राथमिक शाळा, परळी) आणि गीता रामकिशन तिडके (जिल्हा परिषद शाळा, लाडझरी) यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन बोधीचार्य आनंद तूपसमुद्रे यांनी केले, तर प्रास्ताविक बोधिराज सोनवणे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रमाई जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नगरसेवक महादेव रोडे, उपाध्यक्ष मेजर संतोष वावळे, सचिव बोधिराज सोनवणे, सांस्कृतिक अध्यक्ष श्रावण वाघमारे, कोषाध्यक्ष राम डोबे, मिरवणूक अध्यक्ष नागसेन सोनवणे, शुभम भोले आदींसह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास पुरस्कारप्राप्त विद्यार्थी, पालक, तसेच परिसरातील उपासक–उपासिका, बालक–बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# मधुमेह रुग्णांसाठी नेत्रपटल तपासणी शिबिर संपन्न

बीड । प्रतिनिधी

जैन सोशल फेडरेशन अंतर्गत आनंदऋषी वैद्यकीय व संशोधन केंद्राच्या आनंदऋषी नेत्रालय, अहिल्यानगर यांच्या संचलनाखाली बीड येथील आनंदऋषी नेत्रालय व डायग्नोस्टिक सेंटर येथे रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी मधुमेह रुग्णांसाठी मोफत नेत्रपटल (रेटिना) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मधुमेहामुळे रक्तातील साखरेचा डोळ्यांवर होणारा दुष्परिणाम लक्षात घेऊन या शिबिरात रुग्णांची सखोल तपासणी करण्यात आली. या शिबिरात अरविंद नेत्र रुग्णालयातील सुप्रसिद्ध व उच्चशिक्षित तज्ञ नेत्रविशारद डॉ. केतन राठोड तसेच आनंदऋषी नेत्रालय, अहिल्यानगर येथील तज्ञ डॉ. अशोकजी महाडिक व त्यांच्या पथकाने एकूण १२८ मधुमेही रुग्णांची तपासणी केली. तपासणीनंतर काही रुग्णांवर औषधोपचार करण्यात आले तर काही रुग्णांना मधुमेहामुळे



झालेल्या नेत्रविकारांवर शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. तपासणीनंतर आवश्यक ठरलेल्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पूर्णतः मोफत करण्यात येणार आहेत. आनंदऋषी नेत्रालय व डायग्नोस्टिक सेंटर, बीड या शाखेमार्फत गेल्या पाच वर्षांपासून अनेक नेत्ररुग्णांना सकल जैन समाजाच्या सहकार्याने अहिल्यानगर येथे नेऊन काचबिंदूच्या यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. तसेच येथे नियमितपणे मोफत नेत्रतपासणी करून रुग्णांना अल्प दरात चष्मेही उपलब्ध करून दिले जातात. मधुमेहाचे निदान झाल्यानंतर रुग्ण मानसिकदृष्ट्या अस्वस्थ होतो. मधुमेहाचा परिणाम संपूर्ण शरीरावर होत असला तरी डोळ्यांवर परिणाम झाल्यास अंधत्वाची भीती असते. त्यामुळे अशा तपासणी शिबिरांची नितांत गरज असून, मोठ्या रुग्णालयात जाण्याची अडचण टाळून स्थानिक पातळीवरच रुग्णांना दिलासा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य यासंस्थेमार्फत करण्यात आले.

# महाशिवरात्र यात्रा; वाहतुक मार्गात बदल

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

महाशिवरात्री कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून दि.१४ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत धुळे सोलापूर महामार्गावरील वाहतुक मार्गात बदल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी आदेश निर्गमित केले आहेत.१. कन्नड,वेरुळ, खुलताबाद, दौलताबाद मार्गे छत्रपती संभाजीनगर जाणारी वाहने कन्नड,वेरुळ, कसाबखेड फाटा,वरझडी, माळीवाडा, शरनापूर फाटा मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे जातील. २. छत्रपती संभाजीनगर, दौलताबाद, खुलताबाद, वेरुळ मार्गे कन्नडकडे जाणारी वाहने छत्रपती संभाजीनगर, शरनापूर फाटा, माळीवाडा, वरझडी, कसाबखेडा फाटा, वेरुळ मार्गे कन्नडकडे जातील.३. फुलंब्री , सुलतानपुर, खुलताबाद, वेरुळ मार्गे कन्नडकडे जाणारी वाहने फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर, शरनापुर फाटा, माळीवाडा, वरझडी, कसाबखेडा फाटा, वेरुळ मार्गे कन्नडकडे जातील.

# घरकुलचे थकीत हप्ते तातडीने द्या; मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

## शाह अल्पसंख्यांक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची नगरपालिकेकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) अंतर्गत लाभार्थ्यांना अद्याप थकीत असलेले हप्ते तातडीने त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात यावेत, जेणेकरून घरकुलाच्या पुढील बांधकामाला गती मिळेल, अशी मागणी शाह अल्पसंख्यांक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी शेख जेबा कदीर यांनी नगरपालिका प्रशासनाकडे केली आहे.

शहरात सध्या मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट वाढला असून शाळकरी मुलांवर हल्ल्याच्या घटना घडत आहेत. यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांनाही मोकाट कुत्र्यांचा मोठा त्रास सहन



करावा लागत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. या दोन्ही गंभीर प्रश्नांवर नगरपालिकेने तात्काळ उपाययोजना कराव्यात. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराहीजेबा कादिर शेख. अब्दुल कदिर शेख. जावेद शेख यांनी केली यांनी दिला आहे. नगरपालिका प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# श्री नारायण मा. व उ. माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ; बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक

बीड । प्रतिनिधी

विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षणाधिकारी श्री देवगुडे साहेब, होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षणाधिकारी धनंजय शिंदे साहेब, प्रा. श्री हंगे सर, श्री ससाने साहेब ( विस्तार अधिकारी), संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री महादेवरावजी काळे अण्णा, संस्थेचे सचिव तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर, माजी प्राचार्य श्री विनायक ढास सर, पालक म्हणून उपस्थित असलेले श्री कचरू देवडे, इ. उपस्थित होते. प्रथम प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कामिनी निर्मळ व कु.



आरती काळे या विद्यार्थिनींनी केले. प्रास्ताविक आरती काळे या विद्यार्थिनीने केले. गट शिक्षणाधिकारी श्री धनंजय शिंदे साहेबांनी विद्यार्थ्यांना कॉपीमुक्तीची शपथ देऊन कॉपी करू नका असे सांगितले. कॉपी तुमच्या आयुष्याचा नाश करते असे त्यांनी सांगितले. विविध उदाहरणे देऊन कॉपी कशी घातक आहे हे त्यांनी उदाहरण द्वारे पटवून दिले. दहावीच्या विद्यार्थ्यांचा आणि सर्व शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. श्री नारायण विद्यालय सर्वोत्कृष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शाळेतून जन्माची शिदोरी मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. समाजात शाळेमुळे आपली ओळख होत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री शेख सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक अशोक घरत सर,प्रा. पौळ डी.बी, प्रा. मस्के जी.बी, श्री इनकर सर,श्री चौधरी पी. बी, श्री पवार सर,श्री रकटे एन. पी, प्रा.मुरमुडे ए .एन , रकटे बी.आर ,श्रीमती काळे मॅडम, श्रीमती भुतावळे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# इतिहासचे जतन करणार्या श्री. नवनाथ कातखडे यांचा प्राचिण वारसा पुरस्काराने गौरव

## अमुल्य नाणी आणि दुर्मिळ वस्तुंच्या संग्रहाची दखल

बीड । प्रतिनिधी



सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे दि. ०६ जानेवारी २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या औचित्याने विविध सांस्कृती कार्यक्रमांसह विशेष पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले. इतिहास हा केवळ पुस्तकात नसून तो आपल्या अवतीभवती असलेल्या वस्तुंमध्ये आणि नाण्यांमध्ये जिवंत असतो. हे सिध्द करणार्या श्री. नवनाथ कातखडे यांना नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. दिपाताई क्षीरसागर व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनिता शिंदे यांच्या हस्ते महाविद्यालयच्या इतिहास विभागा तर्फे विशेष प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी जमवलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील होण, पेशवेकालीन शिवराई नाणी,तसेच मोगल आणि ब्रिटीश काळातील दुर्मिळ चलन, मौर्य, गुप्त, मराठा काळातील तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील चलनी नोटा, दुर्मिळ अँटीक वस्तुंचा संग्रह अत्यंत कष्टाने जतन केला आहे . विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे १९०० ते २०२५ या कालखंडातील भारतीय नाण्यांचा ऐतिहासीक प्रवास दर्शवणारा, प्रत्येक वर्षाचे प्रतिनिधित्व करणारा अनोखा नाणे संग्रह त्यांनी साकारलेला आहे. या नाणे संग्राहासोबतच त्यांनी अनेक चांदीचे, तांब्याचे वस्तु आहेत. हा दुर्मिळ खजिना हा भावी पिढीसाठी मोठा सांस्कृतीक ठेवा ठरत आहे.

# करुणेचा महासागर, कर्तव्य निष्ठेची प्रेरणा, त्यागाचे प्रतिक, महासुर्याची सावली, कोट्यावधींची माऊली होती रमाई आंबेडकर सर्व महिलांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे: जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन

बीड । प्रतिनिधी

भारतीय बौध्द महासभा या मातृ संस्थेच्या विद्यामाने माता रमाई आंबेडकरांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात थाटा–माटात दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी बुध्द विहार कार्यालय भारतीय बौध्द महासभा बस स्टॅण्ड जवळ, बीड येथे संपन्न करण्यात आली.

सुरुवातीस सकाळी ८.३० वाजता. भारतीय बौध्द महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन करुन धम्मध्वज वंदनेनंतर त्रिसरण–पंचशील सह वंदना घेवून सजवण्यात आलेल्या रथात माता रमाईच्या फोटोची बुध्द विहार संस्थेच्या कार्यालयापासून सवाद्य मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, राजुरीवेस,



बलभीम चौक, धोंडीपुरा, माळीवेस मार्गे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत प्रभात फेरी घेवून आंबेडकर पुतळा येथे पंचशील ध्वजारोहन मुख्य कार्यक्रमानंतर ठीक ११.४५ वाजता बुध्द विहार कार्यालय भारतीय बौध्द महासभा येथे महिला जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे संस्कार विभाग प्रमुख जिल्हा उपाध्यक्ष वामन निकाळजे यांचे माता रमाई आंबेडकर यांचे जीवनावर आधारित प्रवचन घेण्यात आले. त्यावेळी अध्यक्षपदावरुन निसर्गन ताई बोलत होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वागत समारंभ घेण्यात आला. संस्थेच्या केंद्रीय शिक्षीका महिला जिल्हा उपाध्यक्षा कांताताई जाधव, केंद्रीय शिक्षिका संजीवनीताई गडगे, कें.शि.त्रिशलाताई राऊत, नेकनूर येथील निर्मळ ताई पती–पत्नीसह मंगलाताई लोखंडे, विजयाताई जोगदंड, चंद्रभागाताई साळवे, मस्के ताई, या महिलांनी श्रीलंका पर्यटन केल्यामुळे अरुणाताई निसर्गन आणि पद्मीनीताई गायकवाड यांच्या हस्ते वरील महिलांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तसेच रमाई जयंतीचे औचित्य साधून संस्थेचे संरक्षण उपाध्यक्ष कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी काही सैनिकांना बढती देवून असिस्टंट युनीट लिडरपदी निवड करुन त्यांना सैनिक पदाची फित लावून जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन आणि राजाभाऊ आठवले यांनी असिस्टंट लीडचे स्वागत केले. ते वामन निकाळजे, नंदाताई भंडारे, मंदाताई मस्के, शोभाताई आठवले यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात अरुणाताई निसर्गन यांनी आज खर्या अर्थाने माता रमाईच्या संघर्षमय आणि त्यागमय जीवनाचा प्रत्येक महिलांनी आदर्श घेवून आपले जीवन जगले पाहिजे असे आवाहन केले. मंचावर माजी राष्ट्रीय संघटक व्ही.एन.निसर्गन गुरुजी आणि जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे तसेच भारतीय बौध्द महासभेच्या केंद्रीय शिक्षिका, शिक्षक, बहुसंख्य बौध्द बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौतम खेमाडे यांनी केले व आभार बनसोडे गुरुजींनी केले. सरणात्तय होवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी २०२६ ●

## थोडक्यात...

### राज्यस्तरीय बँकिंग स्पर्धा २०२६ मध्ये दोन्ही विद्यार्थ्यांना शेख अमान अफरोज यांना प्रथम पारितोषिक प्रधान



**बीड । प्रतिनिधी**

राज्यस्तरीय बँकिंग स्पर्धा २०२६ मध्ये बीड येथील स्पर्धेच्या खेळामध्ये उत्कृष्ट कुशल अभ्यासक असलेले दोन्ही विद्यार्थी शेख अमन व अफरोज यांना प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले याच अनुषंगाने बीड येथे त्यांचा सत्कार करताना भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी दोन्ही उत्कृष्ट खेळाडू विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला व पुढील उत्कृष्ट खेळासाठी शुभेच्छा दिल्या या वेळी उपस्थित असलेले राहुल दादासाहेब जोगदंड तसेच लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक बीबी वैद्य लोकशाही पत्रकार संघाचे राजकीय विकास समितीचे प्रदेशाध्यक्ष यशवंत कदम साहेब प्रवीण चव्हाण तसेच बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर समीर शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत पॉलिटेक्निक आष्टीचा सलग तीन वर्षांचा हॅटट्रिक विजय

# राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, पॉलिटेक्निक आष्टी या महाविद्यालयाच्या व्हॉलीबॉल संघाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित ऋ-१ झोन विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सलग तीन वेळा विजेतेपद



पटकावत ऐतिहासिक हॅटट्रिक विजय नोंदविला आहे. या दैदीप्यमान यशाच्या जोरावर आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) आष्टीच्या संघाची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या विभागीय स्पर्धेत पॉलिटेक्निक आष्टीच्या संघाने प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट खेळ, संघभावना, शिस्त व तांत्रिक कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले. अंतिम सामन्यात बलाढ्य प्रतिस्पर्धी संघावर मात करत संघाने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. या विजयी १२ खेळाडूंच्या संघाचे नेतृत्व संघनायक ढोले श्रेयश परशुराम यांनी प्रभावीपणे केले. संघात कदम ओंकार अविनाश,शेख नुमान निसार, मुरकुटे गौरव सचिन, मिसाळ ज्ञानेश्वर रामदास, जैदी आमेर इस्लाम, खान साद याह्या, भालेराव महेश विष्णू, मिसाळ शत्रुघ्न मच्छिंद्र, पोकळे युवराज नारायण, मुरकुटे श्रीनाथ संतोष व मिर्झा शोएब आसिफ बेग यांनी उल्लेखनीय कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. संघाच्या या यशामागे क्रीडा प्रशिक्षक प्रा. योगेश पवार यांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले.

► उर्वरित पान २ वर

## स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त आज रविवार दि. ०८ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्व. अमोल गलधर युवा मंच, लिंबागणेश यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्व. अमोल गलधर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली. यावेळी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांची प्रमुख



उपस्थिती होती. तसेच डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याचा व जनतेसाठी दिलेल्या लढ्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. स्व. अमोल गलधर यांनी बीड रेल्वेसाठी उभारलेला संघर्ष, टॉवरवर चढून केलेले शोले स्टाईल आंदोलन, आकाशवाणी बंद पाडण्याचे आंदोलन, तसेच तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पुतळ्याचे दहन करून त्याची राख शासकीय कार्यालयात पाठवण्याचे धाडसी आंदोलन यामुळे ते सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय होते. यासोबतच बीड जिल्हा रुग्णालयात गोरगरिबांच्या सेवेसाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे, असे मत तंटामुक्ती समिती अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले. स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत स्व. अमोल गलधर युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने

► उर्वरित पान २ वर

## तलवाडा ग्रामपंचायतने (अंबिकानगर) तलवाडा येथील विहीरीतील पाणी ऊपसायला सुरु केल्या बद्दल गावकऱ्यांनी मानले आभार

### काहि दिवसापुर्वी विहिरीत आढळून आला होता बेपत्ता तरुणाचा मृत्युदेह

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे काही दिवसापुर्वी जाज्वल्य दैवत माता त्वरितादेवीच्या पायथ्याशी आसलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत गावातीलच एका तरुणाचे शव कुंजलेल्या अवस्थेत पाण्यावर तरंगतांना आढळून आले होते. मय्यत तरुणाचे नातेवाईक व पोलीस प्रशासनाशी निगडित सर्व सोपस्कर पार पढल्या नंतर भाविक भक्तांसह सार्वजनिकरित्या ह्या विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत आसल्याने ह्या



विहिरीतील पाण्याचा पुर्णपणे ऊपसा करण्यात यावा आशी मागणी सार्वजनिकरित्या गावकऱ्यांची आसल्याने तलवाडा येथील पत्रकार अल्ताफ कुरैशी, शेख खिजर जैनोदीन, किशोर हजारे, पवार सर, भारत काळे सह अंबिका ग्रुपच्या सर्व पदाधिका-यांनी तलवाडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी श्री सोपान मुसळे यांना भ्रमध्वनीव्दारे केली होती. त्याची दखल घेत त्यांनी तात्काळ तलवाडा ग्रामपंचायतचे तत्पर कर्मचारी दत्ता मोरे, गणेश हातागळे, लिपिक अरुण डोंगरे यांना पाणी ऊपसण्याच्या लागलीच सुचना दिल्या परंतु त्या ठिकाणी विध्युत पुरवठा बंद आसल्याने जनरेटरची व्यवस्था करण्यास थोडा विलंब झाला आसला तरी दिनांक ८/२/२०२६ रोजी प्रतेक्ष पाणी ऊपसायला सुरुवात करण्यात

►► उर्वरित पान २ वर



बीड : राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर बारामती येथे भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, पार्थदादा पवार यांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच, दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

## ना. पंकजाताईंचे माध्यमातुन परळी येथे होणारा महा पशुधन एक्सपो मेळाव्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : बीड जिल्हा भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे दि. १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत महापशुधन एक्स्पो मेळावा घेऊन बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक विकासासाठी नवसंजीवनी निर्माण करुन दिली आहे शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.



**महापशुधन एक्स्पो मेळावा म्हणजेच बीडच्या शेतकऱ्यासाठी दुग्ध मिश्रित असा शर्करा योग आहे असे म्हटलं तर हरकत नाही म्हणून बीडच्या शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी व नव एक चैतन्य शक्ती आहे – भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील**

बीड जिल्ह्यातील परळी येथे दि. १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी यादरम्यान पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या विभागाद्वारे महापशुधन एक्स्पो हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी सशक्त पशुधन बीड जिल्ह्यातील व राज्यातील शेतकरी पशुपालकांना नवनवीन पशुधनाची व त्यांच्या निगराणीविषयी तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या करिता हे महापशुधन एक्स्पोचे आयोजन केले आहे या प्रदर्शनात ►► उर्वरित पान २ वर



संत श्री गजानन महाराज प्रकटदिन साजरा- आज दि.०८.०२.२०२६ रोजी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव शिवणी( गवळी वस्ती) ता.जि.बीड येथे श्री संत गजानन महाराज प्रकटदिन साजरा करण्यात आला यावेळी सर्वांना स्वीट बॉक्स देण्यात आले.संस्थेचे उपाध्यक्ष यांनी संत श्री गजानन महाराज यांच्या कार्याबद्दल, जीवनाबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी उपाध्यक्ष संस्थेचे उपाध्यक्ष विशाल डोळस, रोहन डोळस, सदस्य व गावकरी होते.

## ग्लोबल विकास ट्रस्टकडून ११ जोडप्यांचा भव्य सामुदायिक विवाह सोहळा संपन्न

### हुंडा न घेण्या – देण्याची शपथ; प्रत्येक जोडप्यांच्या नावे २५ हजारांची बचत ठेव; प्रत्येक वर्षी होणार सोहळा; गोरगरिबांचे आशिर्वाद हीच माझ्यासाठी संपत्ती – मयंक गांधी

**परळी वै. । प्रतिनिधी**

ग्लोबल विकास ट्रस्टच्या पुढाकारातून आणि उद्योजक राजेश मेहता यांच्या सहकार्यातून यावर्षीचा भव्य असा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न झाला. आत्महत्याग्रस्त कुटुंब, अंध आणि अपंग असलेले पालक किंवा अतिशय दुर्बल आर्थिक स्थिती असलेल्या कुटुंबातील जोडप्यांची या सामुदायिक विवाह सोहळ्यात निवड करण्यात आली होती. कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्राच्या जवळ भव्य मंडप उभारण्यात आला होता. सिरसाळा –पोहनेर रोड लागत संपन्न झालेल्या भव्य विवाह सोहळ्यास ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, नीती आयोगाचे सदस्य रमेश चंद, डॉ.हरिश्चंद्र वंगे,



संजय परमार आदींसह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नव वधू आणि वरांना शुभाशीर्वाद दिले. ग्लोबल विकास ट्रस्ट आणि राजेश मेहता यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा सामूहिक विवाह सोहळा अतिशय उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या विवाह सोहळ्यास हजारो पाहुण्यांची उपस्थिती होती. उपस्थितांच्या साक्षीने सर्वांना हुंडा न देण्याची आणि घेण्याची शपथ देण्यात आली, त्याबरोबरच कोणीही कुठल्याही कारणाने आत्महत्या करणार नाही आणि आजुबाजूला कोणाला करू देणार नाही. नैराश्याच्या गर्तेत जर कोणी निदर्शनास आले तर त्याच्या अडचणी सोडवण्यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट नक्कीच प्रयत्नशील राहील. गोरगरिबांचे आशिर्वाद आणि त्यांच्या शुभेच्छा याच माझ्यासाठी मोठी संपत्ती असून यामुळेच ►► उर्वरित पान २ वर





माजलगाव बीड सुभाष भाऊ राऊत अखिल भारतीय महात्मा फुले प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य यांच्या ग्रह प्रवेशाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना संतोष रासवे महादेव नाना आढाव आनंत आढाव कृष्णा गोरे सह मित्र परिवार

## पुढचा चंपावती महोत्सव बीडच्या अद्यावत नाट्यगृहात होईल; आ. विजयसिंह पंडीत यांची ग्वाही

### कलाकारांच्या मागण्या पूर्ण करणे ही आता आपली सामूहिक जबाबदारी: अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

कलेचं महावैभव लाभलेल्या बीड जिल्ह्यात नव कलाकारांची सुजाण पिढी घडवण्याचं महत्त्वाचं काम चंपावती महोत्सव करत आहे. आजवर नाट्यगृहातील सुविधांच्या अभावामुळे कलाकारांना मोठा छळ सहन करावा लागला. मात्र आता नाट्यगृहाच्या दुरुस्ती व अद्ययावत सुविधांसाठी साडेआठ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून कलाकारांच्या हक्काच्या नाट्यगृहाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलणार आहे. पुढील चंपावती महोत्सव अद्यावत नाट्यगृहातच उभा राहील, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार विजयसिंह पंडित यांनी दिली आणि चंपावती महोत्सव अविरत टिकविण्यासाठी आम्ही सर्व पुढाकार घेऊ असे प्रतिपादन दिले. दिनांक ८ फेब्रुवारी २०२० रोजी अनिलदादा जगताप फाउंडेशन आणि शिवसेना बीड आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेअंतर्गत इंग्रजी माध्यमातील समूह नृत्य, जोडी नृत्य व एकपात्री अभिनय स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा राष्ट्रवादीचे नेते आमदार विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. ►► उर्वरित पान २ वर

